# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.१७/०३/२०२१

# पिस्टल व दोन काडतुसासह सराईत गुन्हेगारास भोसरी येथुन अटक

### गुन्हे शाखा, युनिट १, पिंपरी चिंचवडची कारवाई,

दि.१६/०३/२०२१ रोजी गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.अमरनाथ वाघमोडे यांचे आदेशानुसार गुन्हे शाखा, युनिट १ कडील पोलीस अंमलदार रविंद्र गांवडे, अमित खानविलकर, गणेश महाडीक, सचिन मोरे, प्रमोद गर्जे असे देहुरोड, तळेगाव स्टेशन हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना **गणेश महाडीक** यांना माहिती मिळाली की, तळेगाव एम.आय.डी.सी. मधिल कातवी गाव येथे असलेल्या इंद्रायणी नदीचे ब्रीजवर एक इसम येणार असुन त्याचे जवळ पिस्तोल आहे तसेच त्याने अंगामध्ये पाढरे रंगाचा शर्ट त्यावर काळे ठिपके असलेला व काळे रंगाची पँन्ट घातलेली आहे. वगैरे मजकुरची माहिती मिळताच वपोनि अमरनाथ वाघमोडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे वरील स्टाफसह तळेगाव एम.आय.डी.सी. मधिल कातवी गाव येथे असलेल्या इंद्रायणी नदीचे ब्रीज परीसरामध्ये सापळा लावुन थांबले असता बातमीतील वर्णनाचा एक इसम हा ब्रीजवर थांबलेला दिसला तेव्हा त्यास पकडणे कामी जात असताना त्यास पोलीसांची चाहुल लागल्याने तो पळुन जावुन लागला त्याचा पाठलाग करून त्यास मोठ्या शिताफीने पकडले. तेव्हा सदर इसमाचे नाव **अदिनाथ लाला खापे, वय २५ वर्षे, रा.मु.कोंडीवडे, पो.भोईरे, ता.मावळ, जि.पुणे** असे असल्याचे समजले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजुस खोचलेले **एक देशी बनावटीचे पिस्तोल व त्यामध्ये दोन जिवंत काडतुसे** मिळुन आले. त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरूध्द बेकायदेशीर रित्या शस्त्र जवळ बाळगले प्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियमान्वये तळेगाव एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी हा पोलीस रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरूध्द खुन व जबरी चोरी असे गंभीर स्वरूपाचे दोन गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ श्री प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.अमरनाथ वाघमोडे, पोलीस अंमलदार रविंद्र गांवडे, अतिम खानविलकर, गणेश महाडीक, सचिन मोरे, प्रमोद गर्जे यांनी केली आहे.

